४३ १/५/१५

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकिर्ण-२०१५/प्र.क्र.८२/म-८.
महसुल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ०७/०७/२०१५.

14
22888238

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.

विषय : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५.
महसुल विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा अधिसूचित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाने दिनांक २८/०४/२०१५ रोजी "महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५" राजपत्रात अधिसूचित केला असून त्यामधील कलम ३ (१) नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपील प्राधिकारी आणि नियतकालमर्यादा अधिसूचित करणे आवश्यक आहे.

सदर अध्यादेशाच्या कलम २ (ठ) नुसार "सार्वजनिक प्राधिकरण" याचा अर्थ स्पष्ट करण्यात आलेला असून त्यानुषंगाने सार्वजनिक प्राधिकरण म्हणून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून जिल्हाधिकारी कार्यालय किंवा त्यांच्या अधिनस्त कार्यालयांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा अधिसूचित करणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये यासंदर्भात कलम ३ (१) अन्वये राजपत्रात प्रसिध्द करावयाच्या अधिसूचनेमध्ये एकसमानता असण्यासाठी अधिसूचनेचे प्रारुप सोबत जोडले आहे. प्रारुप अधिसूचनेमधील लोकसेवा पुरविण्याबाबतचे स्तर किंवा लोकसेवा पुरविण्यासाठीची निश्चित कालमर्यादा न बदलता पदनामात स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक त्या सुधारणा करण्यास आपणांस मुभा राहील.

कृपया वरीलप्रमाणे अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करुन त्यास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(मनु कुमार श्रीवास्तव)
प्रधान सचिव, महसुल

9/7/15
JS(S)

सहपत्र : वरीलप्रमाणे.

# महाराष्ट्र शासन

3/5/19
84

जिल्हाधिकारी कार्यालय,
-------------------,

दिनांक :

## प्रारूप अधिसूचना

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५.
@ प्रसिध्द करण्यापूर्वी भरावे.

क्र. : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश,२०१५(सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी,जिल्हाधिकारी,-----@-------जिल्हा, याद्वारे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त महसुल कार्यालयांमार्फत नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्ठामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे:-

### परिशिष्ठ

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम | प्रथम अपिल अधिकाऱ्याचे पदनाम | द्वितीय अपिल अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| १. | वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र | १५ | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी |
| २. | जातीचे प्रमाणपत्र | २१ | उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ३. | उत्पन्न प्रमाणपत्र | १५ | ना. तहसिलदार | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी |
| ४. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | २१ | उपविभागीय अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ५. | तात्पुरता रहिवास प्रमाणपत्र | ७ | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी |
| ६. | जेष्ठ नागरीक प्रमाणपत्र | ७ | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी |
| ७. | ऐपतीचा दाखला | २१ | ना. तहसिलदार (रू.२ लक्ष पर्यंत) | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी |
| | | | तहसिलदार (रू.२००००१ ते ८ लक्ष पर्यंत) | उपविभागीय अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | उपविभागीय अधिकारी (रू.८००००१ ते ४० लक्ष पर्यंत) | अप्पर जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| | | | जिल्हाधिकारी (रू. ४० लक्ष वरील) | अप्पर आयुक्त | विभागीयं आयुक्त |
| ८. | सांस्कृतीक कार्यक्रंम परवाना | ७ | तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी | उपविभागीय दंडाधिकारी | अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी |
| | | | अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी | जिल्हा दंडाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ९. | अधिकार अभिलेखाची प्रमाणित प्रत | ७ | लिपिक/ तलाठी | अव्वल कारकून/ मंडळ अधिकारी | ना. तहसिलदार |
| १०. | अल्प भू-धारक दाखला | १५ | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी |
| ११. | भूमीहीन शेतमजुर असल्याचा दाखला | १५ | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी |
| १२. | शेतकरी असल्याचा दाखला | १५ | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी |
| १३. | डोंगर/ दुर्गम क्षेत्रात राहत असल्याचे प्रमाणपत्र | ७ | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी |
| १४. | प्रतिज्ञापत्र साक्षांकीत करणे | १ | अ. कारकून/ ना.तहसिलदार | ना.तहसिलदार/ तहसिलदार | उपविभागीय अधिकारी |

( )

**जिल्हाधिकारी,**

------@-------

6/9/15

४e

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

Office of Collector,

________________,

Dated

## NOTIFICATION

**MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ORDINANCE, 2015.**

@ To be filled in before issue.

No. :-In exercise of the powers conferred by sub-section *(1)* of Section 3 of the Maharashtra Right To Public Services Ordinance, 2015 (Mah.Ord.No.V of 2015), I, the Collector of_____@_____ District, hereby notify the public services rendered by the office of the Collector through the subordinate Revenue offices, along with the stipulated time limits for providing such public services, the Designated officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended herewith, for the purposes of the said Ordinance.

### SCHEDULE

| Sr. No. | Public Service | Time limit for providing service (Days) | Designated Officer | First Appellate Officer | Second Appellate Officer |
|---|---|---|---|---|---|
| *1* | *2* | *3* | *4* | *5* | *6* |
| 1. | *Age, Nationality and Domicile Certificate* | 15 | Tahsildar | Sub-Divisional Officer | Additional Collector |
| 2. | *Caste Certificate* | 21 | Sub-Divisional Officer/ Dy.Collector | Additional Collector | Collector |
| 3. | *Income Certificate* | 15 | Nayab Tahsildar | Tahsildar | Sub-Divisional Officer |
| 4. | *Non Creamy Layer Certificate* | 21 | Sub-Divisional Officer | Additional Collector | Collector |
| 5. | *Temporary Residence Certificate* | 7 | Tahsildar | Sub-Divisional Officer | Additional Collector |
| 6. | *Senior Citizen Certificate* | 7 | Tahsildar | Sub-Divisional Officer | Additional Collector |
| 7. | *Solvency Certificate* | 21 | Nayab Tahsildar (Upto Rs.2 Lacs) | Tahsildar | Sub-Divisional Officer |
| | | | Tahsildar (Rs.200001 to 8 Lacs) | Sub-Divisional Officer | Additional Collector |
| | | | Sub-Divisional Officer (Rs.800001 to 40 Lacs) | Additional Collector | Collector |

| | | | Collector (Above Rs.40 Lacs) | Additional Commissioner | Divisional Commissioner |
|---|---|---|---|---|---|
| 8. | *Permission for Cultural Programme* | 7 | Tahsildar and Taluka Executive Magistrate | Sub-Divisional Magistrate | Additional District Magistrate |
| | | | Additional District Magistrate | District Magistrate | Divisional Commissioner |
| 9. | *Certified Copy of Record of Rights* | 7 | Clerk/ Talathi | Avval Karkun/ Circle Officer | Nayab Tahsildar |
| 10. | *Small Land Holder Certificate* | 15 | Tahsildar | Sub-Divisional Officer | Additional Collector |
| 11. | *Landless Labour Certificate* | 15 | Tahsildar | Sub-Divisional Officer | Additional Collector |
| 12. | *Agriculturist Certificate* | 15 | Tahsildar | Sub-Divisional Officer | Additional Collector |
| 13. | *Certificate of Residence in Hilly Area* | 7 | Tahsildar | Sub-Divisional Officer | Additional Collector |
| 14. | *Attestation of Affidavit* | 1 | Avval Karkun/ Nayab Tahsildar | Nayab Tahsildar/ Tahsildar | Sub-Divisional Officer |

( )
Collector,
___@____